नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

## पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १४
## फेब्रुवारी २००९

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २००९ रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**'' नियुक्त्या ''**

**विषय क्र. ४७२**

'' मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २० (३) अन्वये फेब्रुवारी २००९ अखेर कार्यनिवृत्त होणाऱ्या स्थायी समितीच्या ८ (आठ) मा. सभासदांच्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (५) अन्वये व सन २००७ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र. २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेतील पक्षांच्या किंवा गटांच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देऊन नविन ८ (आठ) मा. सभासदांच्या नियुक्त्या करणे.''

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

**विषय क्र. ४७३**

संदर्भ :– १) मा. आबा बागुल, मा. सुनिल कांबळे, मा. वसंत मोरे, मा. विजय मारटकर, मा. राजेंद्र काची, मा. महादेव बाबर, मा. दिलिप उंबरकर, मा. संदिप लडकत, मा. अरुण धिमधिमे, मा. सौ.अलका खाडे, मा. बापूसाहेब पठारे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. दिपक मानकर, मा. सौ. कमल व्यवहारे, मा. सुनिल बनकर व मा. शंकर बेलदरेपाटील यांचे दि. २८/२/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १९४२, दि. २८/२/२००८.

३) मनपा ठराव क्रं. ५७,दि.२१/५/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

नव्याने होणाऱ्या एस.आर.ओ. योजनेमध्ये पुणे मनपाचे नगरसेवकांचा त्या भागामध्ये होणाऱ्या पुर्नवसनामध्ये समावेश असावा, कारण योजना होत असताना झोपडपट्टी धारकांना दमदाटी केली जाते. त्यामुळे त्या–त्या भागातील नगरसेवकांचा समावेश असण्यास व एस.आर.ओ. चा नकाशा मान्य करण्याचे अधिकार १९४९ च्या नियमानुसार महापालिकेला देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदर ठरावास मा.महा.आयुक्त यांनी महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं. ३०८, दि.२१/११/२००८ चा झाला आहे.)

Unregistered

**विषय क्र. ४७४**

संदर्भ :- १) मा.अशोक हरणावळ व मा.दिपक गावडे यांचे दि. १५/११/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४१६, दि.२५/११/२००८.
३) मनपा ठराव क्र.४१७, दि. २४/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. १०० येथील कै.नारायण देवचंद भामरे सांस्कृतिक भवन व व्यायामशाळेचे बांधकाम करणे व विविध विकासाची कामे करणेकरीता र.रुपये ५४ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८८, १६८ पुणे मनपा वसाहती नव्याने बांधणे, वाकडेवाडी, पांडवनगर, राजेंद्रनगर, आंबिलओढा घोरपडे पेठ क्र. ८-९ राजेवाडी, एकूण तरतूद र.रुपये २,१२,५०,०००/- | ५४ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १०० येथील कै.नारायण देवचंद भामरे सांस्कृतिक भवन व व्यायामशाळेचे बांधकाम करणे व विविध विकासाची कामे करणे | --- | ५४ लाख |

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४९७, दि. २१/१/२००९ चा झाला आहे.)

**विषय क्रं. ४७५**

संदर्भ :- १) सोनिया ग्रामउद्योग प्रशिक्षण केंद्र संस्था यांचा अर्ज.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/भूजिं/१०१८ दि. १२/१२/२००८ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्र. १७००, दि. १६/१२/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

सोनिया ग्रामउद्योग प्रशिक्षक संस्थेस येरवडा फा.प्लॉट नं. ७०/९ औंध स.नं.४६ येथील क्षेत्रिय कार्यालय लगतची व कात्रज स.नं.१३० ते १३३ येथून कचऱ्यातील प्लॅस्टिक वेगळे करण्यासाठी खालील अटीस अधिन राहून पुणे मनपा व सोनिया ग्रामउद्योग केंद्र संस्था यांचे दरम्यान सदर ठिकाणी ओला व सुका कच-यातील प्लॅटिक वेगळे, करण्याचा संयुक्त प्रकल्पाचा ३० वर्षे मुदतीसाठी करारनामा करणेस खालील बाबींचे अधीन राहून मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(अ)** या संयुक्त प्रकल्पासाठी वरील ३ ठिकाणाच्या जागेमध्ये कचरा हस्तांतरण केंद्रावर कोरडा कचरा व प्लॅटिक विलगीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल या कामासाठी योग्य त्या आकाराची रोड बांधण्यास संस्थेस परवानगी दिली जाईल. मात्र सोनिया ग्रामउद्योग केंद्र संस्थेस देण्यात येणा-या जागेची मालकी पुणे म.न.पा.ची राहिल व सदर जागा संस्थेस हस्तांतरण होणार नाही.

**(ब)** विलीनीकरणाव्द्रारे उपलब्ध कोरडा कचरा व प्लॅस्टिक यांची योग्य ती विल्हेवाट लावण्याची परवानगी देण्यात येईल या प्रकल्पाची उपयुक्तता लक्षात घेऊन संयुक्त प्रकल्प ३० वर्षे मुदतीसाठी राबविणेत येईल. मात्र संस्थेने दर ५ वर्षानी ताळेबंद मा. मुख्य लेखा परिक्षक यांचेकडून तपासून कोरडा कचरा व प्लॉटिक यांच्या विल्हेवाटव्द्रारे प्रक्रियेव्द्रारे विक्रीव्द्रारे व अन्य प्रकारे होणा-या नफ्यापैकी प्रतीवर्षी होणाऱ्या नफ्यापैकी २० टक्के पुणे म.न.पा.कडे जमा करावी लागेल.

Unregistered

**अटी :–**

१) मा. मुख्य सभेचे मान्यता दिलेनंतर संस्थेने सदर संयुक्त प्रकल्पाचा करारनामा दोन महिन्याचे आत करून घेतला पाहिजे अन्यथा प्रकल्प रदद् समजण्यात येईल.

२) सदर संयुक्त प्रकल्पासंदर्भात वरील उददेशाशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी वापर अनुज्ञेय राहणार नाही अशा प्रकारे अन्य वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा सदर प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याचे निदर्शनास आल्यास अथवा सदर संयुक्त प्रकल्पाद्वारे पुणे महानगरपालिकेस ओला व सुका कचरा विलिणीकरणाद्वारे दृष्टीने फायदा होत नसल्याचे निदर्शनास आल्यास सदर प्रकल्प तात्काळ रदद् करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

३) भविष्यात कचरा हस्तांतरण केंद्राच्या वाढीसाठी वा अन्य कारणासाठी सदर जागेची आवश्यकता भासल्यास त्या त्या जागेच्या प्रकल्प रदद् करून इतरत्र हलविणे आवश्यक राहिल. यासाठी संस्थेची कोणतीही तक्रार राहणार नाही.

४) सदर कचरा हस्तांतरण केंद्रावर या प्रकल्पासाठी सुयोग्य जागा निश्चित करणे शेडची आवश्यकतेनुसार आकार ठरविणे हे अधिकार उप आयुक्त (घनकचरा व व्यवस्थापन ) यांना राहील.

५) सदर संयुक्त प्रकल्पाच्या जमाखर्च ताळेबंदाची तपासणी पुणे महानगरपालिकेच्या लेखा परिक्षण कार्यालयाकडून करून घेणे आवश्यक राहील व त्या दृष्टीने संस्थेस जमाखर्च व अनुषंगिक दस्तऐवज ठेवावे लागतील.

६) कोरडा कचरा अगर मिश्रीत कचरा यातून प्लॅस्टिक व इतर कोरडा कचरा वेगळा करणे याबाबत संपूर्ण जबाबदारी (उदा. कर्मचारी नेमणूक ) ही सोनिया ग्रामद्योग प्रशिक्षण केंद्र याची राहील.

७) प्लॅाटिक व कोरडा कचरा या पासून मिळणा–या दैनंदिन उत्पन्नाची माहिती संकलित करून ती म.न.पा. आरोग्य खाते (घनकचरा व्यवस्थापन ) विभागाकडे दर महिन्याला सोनिया ग्रामद्योग प्रशिक्षण केंद्र यांनी पुरवली पाहिजे.

८) सदर ठिकाणी कामे करताना येथील कर्मचा–यांचा अपघात किंवा इजा झाल्यास त्यास पुणे म.न.पा. जबाबदार राहणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी सोनिया ग्रामद्योग प्रशिक्षण केंद्र संस्थेवर राहिल.

९) कचरा हस्तांतरण केंद्रावर या कामाची देखरेख संबंधित क्षेत्रिय अधिकारी ठेवतील.

१०) या अटी व्यतिरिक्त अन्य अटी ठरविण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे फेब्रुवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४७४, दि.२०/१/२००९ चा झाला आहे.)

<u>**विषय क्र. ४७६**</u>

संदर्भ :–
१) संरक्षण खात्याचा जा.क्र. ४१११/डीईव्हीपी/पीएमसी/क्यू३ (एल ॲण्ड एच), दि.१२/५/२००८ चा प्रस्ताव व त्याअनुषंगाने दि. ६/८/२००८ रोजीचे पत्र.
२) पुणे सब एरिया हेड क्वॉर्टर्स येथे झालेली दि. ५/८/२००८ रोजीची बैठक व त्यानुसार त्यांचे दि. ६/८/२००८ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६६५ दि. २२/७/२००८
४) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/७५९, दि. ३/११/२००८ चे पत्र.
५) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/३५९७, दि. १०/११/२००८ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७२५, दि. ६/१/२००९.

–––

Unregistered

मा.महा.आयुक्त यांनी संदर्भांकित क्र. ४ व ५ या पत्रामध्ये दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

संरक्षण खात्यास शैक्षणिक संस्थेसाठी आवश्यक असणा–या जागांबाबत संरक्षण खात्याने केलेल्या मागणीची पूर्तता करणेकरीता खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) स.क्र. ६१ घोरपडी येथील हायस्कूल व प्लेग्राऊंडकरीता आरक्षित असलेल्या जागेवर तसेच स.क्र.११८/२क , वारजे येथील प्रायमरी स्कुलसाठी आरक्षित जागेवर पुणे मनपा व संरक्षण खात्याच्या संयुक्त विद्यमाने संयुक्त शैक्षणिक प्रकल्प राबविणेकरीता ही जागा संरक्षण खात्यास हस्तांतरित करणेस.

२) संरक्षण खात्यासोबत संयुक्त विद्यमाने राबविणेच्या प्रकल्पांबाबतच्या सर्व अटीशर्ती ठरविणेचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना सोपविणेस.

**<u>विषय क्र. ४७७</u>**

संदर्भ :– १) स्थायी समिती ठराव क्र. ६२५ दि. १६/८/१९६९.
२) स्थायी समिती ठराव क्र. १३७७ दि. १६/१२/१९९७.
३) जागा मालकांतर्फे ॲड्.चौधरी यांनी पुणे महानगरपालिकेस बजावलेली खरेदी सूचना दि.१७/१०/२००८.
४) विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६ यांचे पत्र जा.क्र. एलए/२१६/९०५३, दि.२४/११/२००८.
५) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूप्रा/१०१७ दि. १२/१२/२००८ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७३१, दि. ६/१/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे, पेठ बुधवार सि.स.नं. ७६७ येथील रस्तारुंदीतील बाधित मिळकतीचे भूसंपादन करण्यासाठी जागा मालकांतर्फे ॲड्.चौधरी यांनी बजावलेल्या खरेदी सूचनेनुसार सहा महिन्यांचे दरम्यान भूसंपादनाची कार्यवाही सुरु होणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षण रद्द होऊ शकते. सबब ॲड्.पी.जी.चौधरी यांनी दिलेल्या खरेदी सुचनेनुसार सि.स.नं. ७६७, ७६६, ७५२, ५२५ ते ५३५, ५६५ ते ५७५ इ. बुधवार पेठ या मिळकतींवर कलम २१०(१)(ब) अन्वये आखण्यात आलेल्या रस्तारुंदी क्षेत्राचे भूसंपादन करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ४७८</u>**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/कआकस/१०३९ दि. १७/१२/२००८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७३७, दि. ६/१/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मिळकतीच्या मालकी हक्कातील बदलासाठी हस्तांतरण फी मध्ये वाढ करणेबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्र दप्तरी दाखल करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ४७९</u>**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.अ.म.आ./उपआ(ज)/९७३,दि.५/१२/२००८ चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ३२, दि. १७/१२/२००८.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७७६, दि. ६/१/२००९.

–––

Unregistered

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नांवे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा त्यांना खालील अटीवर अदा करणेस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा. महा.आयुक्त यांचे या विषयपत्रालगतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या संस्थांनी जरुर तो करारनामा लिहून दिल्यानंतर संस्थांच्या नावे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा संबंधित संस्थांना अदा करणेस.

ब) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर परिशिष्टाध्ये नमूद केलेल्याप्रमाणे शासकीय अधिकारी यांची नेमणुक करणेस.

क) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर ती संस्था ज्या वॉर्डाध्ये येत असेल त्या वॉर्डाचे विद्यमान सभासद नेमणेस.

ड) मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्याप्रमाणे संबंधित संस्थांची नांवे व पत्ते दुरुस्ती व बदल करणेस.

<u>विषय क्र. ४८०</u>

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्रं. मआ/मुले/१०५६, दि. १९/१२/२००८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७८१, दि. ६/१/२००९.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधून र.रुपये २ लाखाचे वर्गीकरण कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, ७.रुग्णालये, प्रसुतिगृह, औषधालये, आरई१७ओ२०२, क्र.२ रुग्णालये, प्रसुतिगृहे, औषधालये, १) भवन दुरुस्ती या खात्यातून मा.क्षेत्रिय अधिकारी, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय, १.मुख्य देखरेख वसूली व इतर, आरई११डब्ल्यू१०२बी, १) कायम सेवकवर्ग र.विभागीय कार्यालय, २) संकिर्ण या खात्याकडे वर्ग करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

Unregistered

<u>विषय क्र. ४८१</u>

संदर्भ :– १) मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/६७६, दि. २९/१२/२००८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७९१, दि. ६/१/२००९.

–––

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक (वेतनश्रेणी रुपये ३०५० ते ७१५०) व सिनिअर ग्रेड लेखनिक (वेतनश्रेणी रुपये ४३०० ते १००४५) पदावरील नेमणूकीबाबत शिफारस केलेल्या निवड/प्रतिक्षा यादीवरील खालील उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, आरक्षण/अनुशेष इत्यादी बाबी विचारात घेऊन मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक), पुणे महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) प्रमाणे नेमणूक करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>निवड यादी (सिनिअर ग्रेड लेखनिक)</u>**

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री.संजीव रामचंद्र भोंडे | अ.जा. |
| २) | श्रीमती शैला राजेंद्र भोसेकर | अ.जा. |

**<u>प्रतिक्षा यादी</u>**

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री.रविंद्र सदाशिव कांबळे | अ.जा. |

निवड यादी

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्रीमती कल्पना दिनेश म्याडम | वि.मा.प्र. |

निवड यादी

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्रीमती हेमलता शिवाजी शिंदे | खुला |
| २) | श्रीमती मनिषा मिहीर थत्ते | खुला |
| ३) | श्रीमती विजया सुरेश महाडिक | खुला |
| ४) | श्रीमती निलंजना बाबुराव पायगुडे | खुला |
| ५) | श्रीमती संगीता गोरखनाथ सोनवणे | खुला |
| ६) | श्री.सागर यशवंत कर्वे | खुला |

प्रतिक्षा यादी

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्रीमती शुभांगी जगन्नाथ राजहंस | खुला |
| २) | श्री.अरुण राघोजी रावडे | खुला |
| ३) | श्रीमती मोहिनी हेमंत बाचल | खुला |
| ४) | श्रीमती हेमलता यशवंत देशपांडे | खुला |
| ५) | श्री.गजानन पांडुरंग जाधव | खुला |
| ६) | श्री.उत्तम निवृत्ती तावरे | खुला |

निवड यादी (ज्युनिअर ग्रेड लेखनिक)

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री.प्रविण विनायक माळवे | खुला |
| २) | श्रीमती रेवती सुनील पिंपुटकर | खुला |
| ३) | श्री.रविंद्र लक्ष्मण कवितकर | खुला |

प्रतिक्षा यादी (ज्युनिअर ग्रेड लेखनिक)

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री.महेंद्र नारायण कांबळे | खुला |
| २) | श्री.दिलीप कोंडिंबा कंधारे | खुला |
| ३) | श्री. जॉन फ्रान्सिस केदारी | खुला |

Unregistered

श्री.रविंद्र सदाशिव कांबळे (अ.जा.) यांना सिनिअर ग्रेड लेखनिक संवर्गातून मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाकडे सिनिअर ग्रेड लेखनिक संवर्गात नेमणूक झाल्यानंतर मनपा प्रशासनाकडील हायर डिपार्टमेंट परीक्षा पास होण्याच्या अटीवर प्रतिक्षा यादीवर घेण्यात आले आहे.

विषय क्र. ४८२

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उद्यान/से/११२५, दि. ३१/१२/२००८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १७९२, दि. ६/१/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या आयातकर कार्यालयाकडे तत्कालिन कार्यरत श्री.लालचंद हरिचंद खोलवाल, सिनिअर ग्रेड लेखनिक, उपआयुक्त (गवनि) कार्यालय, श्री.अनिल रामचंद्र डवरी, ज्युनिअर ग्रेड लेखनिक, नगर उपअभियंता(व्हेईकल डेपो) कार्यालय यांचा दि. २७/१/२००६ पासून ते प्रत्यक्ष कामावर

रुजु झालेला निलंबन कालावधी हा सेवाकाळ म्हणून ग्राह्य धरुन सदर कालावधीतील वेतन व तदनुषंगिक फायदे देणेसाठी सदर प्रकरणी मनपा सेवाविनियम क्र. ६१ नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४८३**

संदर्भ :– १) संरक्षण खात्याकडील पत्र – डीपी बटालियन बॉम्बे इंजिनिअर ग्रुप नं. केंद्र पीन ९०८७९५ मार्फत ५६ एपीओ जावक नं. ४७२१७/पीएमसी/९४/क्यू दि. १८ ऑक्टोंबर २००८.

२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेराशपुअ/११६९ दि. ७/१/२००९ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १८९७, दि. २०/१/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

संरक्षण खात्याच्या हद्दीमध्ये नविन होणारा होळकर पूल हा ८ लेनचा असल्याने व चंद्रमा चौकापासून आळंदीकडे जाणारा रस्ता ६० मी.रुंदीचा आहे. तसेच चंद्रमा चौकापासून येरवडाकडे जाणारा रस्ता ३० मी.रुंद असल्याने चंद्रमा चौक ते नविन होळकर पूल हा ८०० मी.लांबीचा संरक्षण खात्याच्या हद्दीमधून जाणारा रस्तादेखील ३० मी.रुंद करणे आवश्यक आहे व त्यासाठी अंदाजित खर्च रुपये ७.१० कोटी आहे. वरील कामांसाठी संरक्षण खाते जागा उपलब्ध करुन देत असल्याने सदरची कामे करण्यास मनपा अर्थसंकल्प २००८ व ०९ मधील एसपीव्हीच्या तरतूदीमधून एकूण रुपये १९.७० कोटी (१२.६०+७.१०) खर्च करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४८४**

संदर्भ :– १) मा.अरुण धिमधिमे व मा.प्रसन्न जगताप यांचे दि. ९/१/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं १९०२, दि.२०/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.१२७ मध्ये आनंद विहार परिसर राजीव गांधी वसाहत येथे ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रुपये ५ लाख व उद्यम गल्ली भागात डांबरीकरण करणेसाठी र.रु. ४ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, ४.ब. महिला बाल कल्याण योजना, पान क्र. २३४, अ.क्र. १९, महिला बाल कल्याण निधी अंतर्गत करावयाची कामे, (यादी क्र. एस ३८), पान क्रं.३०८,अ.क्रं.२९, वॉर्ड क्रं.१०२ स. नं. १३३ अंबिल ओढा आय. सी. डी. एस. अंतर्गत बालवाडी बांधणे (एकुण तरतुद २५ लाख) | ९ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १)वॉर्ड क्रं.१२७ मध्ये आनंद विहार परिसर राजीव गांधी वसाहत येथे ड्रेनेज लाईन टाकणे | --- | ५ लाख |
| २) उद्यम गल्ली भागात डांबरीकरण करणे. | --- | ४ लाख |

Unregistered

**विषय क्र. ४८५**

संदर्भ :– १) मा.दिपक मानकर यांचे दि. १५/१/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्रं. १९०४, दि.२०/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ५७ मध्ये विविध ठिकाणी बंदिस्त गटारे बांधणेसाठी र.रुपये ८.५० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, ४. गवनि निधीतून करावयाची कामे, ४–अ मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधी, पा.क्र. २३४, अ.क्र. ८, यू.सी.डी.अंतर्गत करावयाची कामे, (यादी क्र. एस–३६), पान क्र. ३०६, अ.क्र. ४, वॉर्ड क्र. ५७ मधील २० अंगणवाड्यांमध्ये लाईट, पिण्याचे पाणी, रंगकाम, फ्लोअरींग दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे (मान्य तरतूद र.रुपये १० लाख) | ८.५० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ५७ मध्ये विविध ठिकाणी बंदिस्त गटारे बांधणे | --- | ८.५० लाख |

**विषय क्र. ४८६**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.अ.म.आ./उपआ( ज) /१११३, दि.२९.१२.२००८ चे पत्र.

२) विधी समिती ठराव क्र. ३६ दि. ७/१/२००९.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९३२, दि. २०/१/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नांवे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा त्यांना खालील अटीवर अदा करणेस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

इ) मा. महा.आयुक्त यांचे या विषयपत्रालगतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या संस्थांनी जरुर तो करारनामा लिहून दिल्यानंतर संस्थांच्या नावे मान्य झालेल्या देणगीच्या रकमा संबंधित संस्थांना अदा करणेस.

ब) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर परिशिष्टाध्ये नमूद केलेल्याप्रमाणे शासकीय अधिकारी यांची नेमणुक करणेस.

क) संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर ती संस्था ज्या वॉर्डाध्ये येत असेल त्या वॉर्डाचे विद्यमान सभासद नेमणेस.

ड) मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्याप्रमाणे संबंधित संस्थांची नांवे व पत्ते दुरुस्ती व बदल करणेस.

**विषय क्र. ४८७**

संदर्भः– १) राष्ट्कुल यूवा क्रिडा स्पर्धा समितीचे सहनिमंत्रक यांचे दि. १८/१२/२००८ चे पत्र.

२) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(स.क.)/१२४२, दि. २०/१/२००९ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९५४, दि. २०/१/२००९.

---

Unregistered

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

राष्ट्रकुल युवा क्रिडा स्पर्धेकरीता भारतीय संघातील महाराष्ट्राच्या खेळाडूंना पंडित नेहरु स्टेडियम विभागाकडील २००९–१० च्या अंदाजपत्रकातील प्रस्तावित तरतुदीमधून पुढील तीन वर्षांसाठी खालील विजेत्या खेळाडूंना प्रतिवर्षी प्रत्येकी एक लाख रुपये शिष्यवृत्ती देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सन २००९–१०, १७–खेळ व क्रिडांगणे, क–पंडित नेहरु स्टेडियम, २३– आंतरराष्ट्रीय खेळाडूंना सराव करणे, साहित्य खरेदी करणे, अनुषंगिक खर्चासाठी निधी उभारणे.

**खेळाडूंची नांवे**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.राहुल आवारे – कुस्ती (सुवर्ण) | २) | श्री.रणजित नलावडे – कुस्ती (सुवर्ण) |
| ३) | श्री.अजित पाटील – कुस्ती (सुवर्ण) | ४) | भाग्यश्री शिंर्के – ॲथलेटिक्स (सुवर्ण) |
| ५) | कु.सायली द्रविड – ॲथलॅटिक्स | ६) | श्री. वीरधवल खाडे – जलतरण (३ सुवर्ण+३रौप्य) |

**विषय क्र. ४८८**

संदर्भ :– १) मा.अरुण धिमधिमे व मा.प्रसन्न जगताप यांचे दि. १९/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १९५५, दि.२७/१/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.१०४ मधील पु.ल.देशपांडे उद्यान येथे स्विमिंग पूल बांधणेसाठी र.रु. १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३२, अ.क्र.१, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–४), पान क्रं.३०१, अ.क्रं. ४६, वॉर्ड क्रं. १०२ स.नं. १३२ येथील झोपडपट्टीच्या कडेने कॅनॉलच्या कडेने फरशी बसविणे (एकूण तरतूद ३० लाख) | १० लाख | ––– |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| पु.ल.देशपांडे उद्यान येथे स्विमिंग पूल बांधणे. | ––– | १० लाख |

**विषय क्र. ४८९**

संदर्भ :– १) मा.अरुण धिमधिमे व मा.प्रसन्न जगताप यांचे दि. १९/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १९५६, दि.२७/१/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.१२७ मध्ये अजिंक्यनगर ते मागील भाग ते श्रीयस बेकरी गल्ली स.नं. २५ व २६ पेव्हरने डांबरीकरण करणेसाठी र.रुपये ५ लाख व अरविंद कॉम्पलेक्स व अतुल पार्क नारायण अपार्टमेंटसाठी डांबरीकरण करणेसाठी र.रु. ५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३२, अ.क्र.१, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–४), पान क्रं.३०१, अ.क्रं. ४६, वॉर्ड क्रं.१०२ स.नं. १३२ येथील झोपडपट्टीच्या कडेने कॅनॉलच्या कडेने फरशी बसविणे (एकूण तरतूद ३० लाख) | १० लाख | ––– |

UnRegistered

**नविन सुचविलेली कामे**

| | | |
|---|---|---|
| १) अजिंक्यनगर ते मागील भाग ते श्रीयस बेकरी गल्ली स.नं. २५ व २६ पेव्हरने डांबरीकरण करणे | --- | ५ लाख |
| २) अरविंद कॉम्पलेक्स व अतुल पार्क नारायण अपार्टमेंटसाठी डांबरीकरण करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ४९०**

संदर्भ :- १) मा.अरुण धिमधिमे व मा.प्रसन्न जगताप यांचे दि. १९/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १९५७, दि.२७/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.१०४ मधील विविध ठिकाणचे धोकादायक पोल काढुन अंडरग्राउंड केबल टाकणेसाठी र.रुपये १० लाख व वॉर्ड क्रं.१०४ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रु.१० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-२००९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. २३४, अ.क्र. ८, युसीडी अंतर्गत करावयाची कामे, (यादी क्र.एस-३६), पान क्रं.३०६, अ.क्रं.१०, प्र.क्र .१०२ दत्तवाडी येथे बौध्दस्तुप बांधणे. | २० लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) वॉर्ड क्रं.१०४ मधील विविध ठिकाणचे धोकादायक पोल काढुन अंडरग्राउंड केबल टाकणे. | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्रं.१०४ मधे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. ४९१**

संदर्भ :- १) कार्यालयीन आदेश जा.क्र. मआ/सआ/से/१०४१ दि. ४/७/२००८.
२) कार्यालयीन परिपत्रक जा.क्र. मुले/३६४ दि. २९/५/२००७.
३) डॉ.तोरे सुनिल आशाराम यांचा जा.क्र. १५५८ दि. ७/११/२००८ चा विनंती अर्ज.
४) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. अतिमआ/उअका/से/१२१८, दि.१६/१/२००९ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९६५, दि. २७/१/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

डॉ. तोरे सुनिल आशाराम, लसीकरण अधिकारी (वेतनश्रेणी रुपये १०००० ते २०२५०) यांनी दि. ५/७/२००८ पासून स्वत:चे पदाचे काम संभाळून ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफीसर (वेतनश्रेणी रुपये १०००० ते २०२५०) या पदाचे अतिरिक्त कामकाज केल्यामुळे त्यांना ५% विशेष वेतन किंवा जास्तीत जास्त रुपये ७५०/- दरमहा विशेष वेतन आदा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४९२**

संदर्भ :- १) मा. सौ. मनिषा घाटे व मा. सौ. मेधा कुलकर्णी यांचे दि. २१/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १९९१, दि.२७/१/२००९.

---

UnRegistered

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.८१ मध्ये विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणेसाठी र.रु.१० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, १२. भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८८, अ.क्र. १८०, शहरात विविध ठिकाणी विरंगुळा केंद्र उभारणे, (यादी क्र.एस–३४),पान क्रं.२९२, अ.क्रं.१५, वॉर्ड क्र. ८१ स्नेहनगर परिसरात विरंगुळा केंद्र उभारणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| वॉर्ड क्रं.८१ मध्ये विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. ४९३**

संदर्भ :– १) मा. दिलिप उंबरकर व मा. शंकरराव बेलदरे पाटील यांचे दि. २७/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १९९२, दि.२७/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.५९ मध्ये विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणेसाठी र.रु.१५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३४, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–२३),पान क्रं.२८७, अ.क्रं.१३, वॉर्ड क्र. ५९ मध्ये स. नं. १११/११२ येथे मनपाची शाळा बांधणे. (एकूण तरतुद २५ लाख) | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| वॉर्ड क्रं.५९ मध्ये विविध ठिकाणी काँक्रीटीकरण करणे. | --- | १५ लाख |

**विषय क्र. ४९४**

संदर्भ :– १) मा. दिलिप उंबरकर व मा. संदिप लडकत यांचे दि. २७/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १९९३, दि.२७/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.५९ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रु.५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३४, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–२३),पान क्रं.२८७, अ.क्रं.१३, वॉर्ड क्र. ५९ मध्ये स. नं. १११/११२ येथे मनपाची शाळा बांधणे. (एकूण तरतुद २५ लाख) | ५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| वॉर्ड क्रं.५९ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ५ लाख |

UnRegistered

**विषय क्र. ४९५**

संदर्भ :- १) मा. दिलिप उंबरकर व मा. संदिप लडकत यांचे दि. २७/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १९९४, दि.२७/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.५९ मध्ये बालवाडी बांधणेसाठी र.रु.५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–२००९ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. १३४, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–२३),पान क्रं.२८७, अ.क्रं.१३, वॉर्ड क्र. ५९ मध्ये स. नं. १११/११२ येथे मनपाची शाळा बांधणे. (एकूण तरतुद २५ लाख) | ५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| वॉर्ड क्रं.५९ मध्ये बालवाडी बांधणे. | --- | ५ लाख |

## विधी समितीचे ठराव

**विषय क्रं. ४९६**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ./उआ.(जिं.घ.)/से/८७६, दि. २७.११.२००८ चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ३४, दि. ७/१/२००९.

---

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील लेखनिकी संवर्गात बढतीसाठी आवश्यक असणारी हायर डिपार्टमेंटल परिक्षेची तीन संधीमध्ये बसून उत्तीर्ण होण्याची अट रद्द करून सदरच्या परिक्षेत उत्तीर्ण होईपर्यंत सेवकांना परिक्षेस बसण्याची संधी देऊन, सदरची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर येणा–या बढती प्रसंगी रोस्टर स्थिती व रिक्त जागा विचारात घेऊन प्रचलित धोरणानुसार लगतच्या वरीष्ठ पदावर बढती देणेबाबतच्या धोरणास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४९७**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे जा.क्र.मआ/मुउअ/से/१०४०,दि.१७/१२/२००८चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्र. ३५, दि. ७/१/२००९.

---

मा. अति.महा.आयुक्त (वि) यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील **'जमादार '** वर्ग –४ ( वे.श्रे.रू.२९५५ ते ५९६० + मान्य भत्ते ) या संवर्गातील नेमणूकीसाठी लगतच्या निम्न **'शिपाई '**संवर्गातील सेवकांच्या सेवातपशील, खात्याची शिफारस, विहीत शैक्षणिक पात्रता, मुलाखतीत दिसून आलेली गुणवत्ता, वर्तणूक या बाबींचा विचार करून खातेनिहाय बढती समितीने खाली नमूद केलेल्या निवड यादीस तसेच सदर निवडयादीवरून नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

UnRegistered

**निवडयादी**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री. गालिंदे दिलीपकुमार बाबुराव | भज (क) |
| २) | श्री. देशपांडे मुरलीधर सदाशिव | खुला |
| ३) | श्रीमती जाधव कुसुम दत्तु | खुला |
| ४) | श्री. आंग्रे सुरेश रामजी | इमाव |

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. ४९८**

संदर्भ :– १) महानगर आयुक्त मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण यांचेकडील अ.शा.प्र.क्र. प्र/आस्था – १५/२००८, दि. ०३ जानेवारी २००८.
२) मा. महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहमआ/से/११०२,दि. ८/१/२००८ चे पत्र.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४१८, दि. ५/२/२००८.
४) मनपा ठराव क्रं.९४,दि.९/६/२००८.
५) मनपा ठराव क्रं.२२३,दि.२३/९/२००८.

–––

श्री. अनिल गायकवाड, उप आयुक्त (समाजकल्याण), पुणे यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात विशेष कार्याधिकारी (पुर्नवसन व पुनर्वसाहती) या पदावर प्रतिनियुक्तीसाठी स्वीयेत्तर सेवेबाबत (प्रतिनियुक्ती) मनपा सेवाविनियम प्रकरण ५ येथील नियम ४१ नुसार श्री. अनिल गायकवाड यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे नियुक्ती करता येईल. मनपा सेवाविनियम ४१(ब) नुसार सदरची प्रतिनियुक्ती फक्त मा. महानगरपालिका सभाच करु शकेल अशी तरतूद आहे. त्यामुळे प्रतिनियुक्तीस मा. मुख्य सभेची मान्यता आवश्यक आहे. श्री. अनिल गायकवाड, उप आयुक्त (समाजकल्याण) (वे. श्रे. १०६५० ते २२१५० + मान्य भत्ते) यांची प्रथमत: २ वर्ष कालावधीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे प्रतिनियुक्तीसाठी मनपा सेवाविनियम ४१(ब) नुसार मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.
(टिप :– सदर विषयाचा विचार माहे नोव्हेंबर २००८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्रं.३९८,दि.२४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४९९**

संदर्भ :– १) मा.अवर सचिव यांचे पत्र जा.क्र.टिपीएस–१८०६/२१२५/प्र.क्र.११९३/०८/नवि–१३, दि.३/६/२००८.
२) मा.स्थायी समितीस सादर केलेले विषयपत्र जा.क्र.मआ/नअ/११९७, दि.५/२/२००८.
३) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०६४, दि. ७/११/२००७.
४) मा.स्थायी समिती ठ.क्र.८३५, दि.१२/९/२००६.
५) मा.स्थायी समिती ठ.क्र.२९२, दि.२७/५/२००३.
६) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१०६६, दि. २१/२/२००३.
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७३७, दि. २३/१०/२००८.
८) मा. सौ.मुक्ता टिळक व मा.बंडू केमसे यांची दि. १६/१२/२००८ ची उपसूचना.
९) मा.विशाल तांबे व मा.शांतीलाल मिसाळ यांची दि. १६/१२/२००८ ची उपसूचना.
१०) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९७, दि. १६/१२/२००८.

विषय – पुणे मनपा वाढीव हद्दीतील २३ गावांमधील डोंगर उताराचे कंटुर सर्वेक्षण करून १.५ या निकषानुसार डोंगरपायथ्याची हद्द निश्चित करणे या कामाचे नकाशे व अहवालाबाबत.

–––

UnRegistered

मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले. शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे मनपाने शासनाकडे नकाशे पाठविताना सी–डॅक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार नकाशांवर बी.डी.पी.ची हद्द दर्शविलेली आहे. तथापी आता प्रशासनाने मोनार्क या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचे नकाशे सादर केलेले आहेत. याबाबत दोन्ही नकाशांमधील कडकात कडक ( Stringent of two ) नुसार कार्यवाही करावी तसेच प्रशासनाने मोनार्क या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचे नकाशे शहर सुधारणा समितीकडे सादर केलेले आहेत असे निदर्शनास आलेले आहे. काही ठिकाणी सी–डॅक व मोनार्क या दोन्ही नकाशांमध्ये बी.डी.पी.आलेले नाही. मात्र जागेवर डोंगर सदृश्य परिस्थिती आहे. मौजे बावधन स.नं.५८ मधील जमिनीच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. पौड रस्त्याच्या ब–याच उंचीवर ही मिळकत आहे. सबब सदर मिळकत बी.डी.पी. मध्ये समाविष्ट करण्यात यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## विषय क्र. ५००

संदर्भ :– १) मा. अति.महा.आयुक्त (वि) मआ/उआ(जिंघ) /१११७, दि. २९/१२/२००८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २१०, दि. १३/१/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेच्या व्हेईकल डेपो विभागाकडील क्लिनर (समय वेतन श्रेणी रू. २६१० ते रू. ५५१०+मान्य भत्ते ) या वर्ग ४ च्या हुद्दयाची रिक्त पदे भरणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस व प्रतिक्षा यादीस व त्यावरील उमेदवारांची सदर पदांच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदरची प्रतिक्षायादी ही निवडयादीवरील उमेदवारांच्या संख्येपर्यंत उमेदवार रूजू होईपर्यंत किंवा १ वर्षाचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील.

**क्लिनर या पदासाठी निवडयादी अनुसूचित जातीच्या गटासाठी – ३ जागा**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १) | श्री.घटकांबळे वैभव कोंडीराम |
| २) | श्री.कानडे संतोष दत्तात्रय |
| ३) | श्री. रोहिटे अनिल रामचंद्र |

**क्लिनर या पदासाठी प्रतिक्षायादी अनुसूचित जातीच्या गटासाठी**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १) | श्री.नगरकर प्रशांत रविंद्र |
| २) | श्री.चित्ते निवृत्ती महादेव |
| ३) | श्री.शिंदे सचिन मच्छिंद्र |

**क्लिनर या पदासाठी निवडयादी भटकी जमात (ड) गटासाठी – १ जागा**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १) | श्री.भगत सचिन दशरथ |

**क्लिनर या पदासाठी प्रतिक्षायादी भटकी जमात (ड) गटासाठी**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १) | श्री.नांगरे रोहित अरूण |

Unregistered

**क्लिनर या पदासाठी निवडयादी इतर मागासवर्गीय गटासाठी – ६ जागा**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १) | श्री.शेलार सुनिल एकनाथ |
| २) | श्री. पाथरकर देवेंद्र मधुकर |
| ३) | श्री. मोहिरे सत्यजीत आनंदराव |
| ४) | श्री. पेटकर प्रमोद धनराज |
| ५) | श्री. कदम बाळकू दिनकर |
| ६) | श्री. भुजबळ संतोष कैलास |

**क्लिनर या पदासाठी प्रतिक्षायादी इतर मागासवर्गीय गटासाठी**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १ | श्री. मुजावर इरफान इफ्तेकार |
| २ | श्री. हाडके अमोल बबन |
| ३ | श्री. भुजबळ संतोष मोहन |

**विषय क्र. ५०१**

संदर्भ :- १) मा. अति.महा.आयुक्त (वि) मआ/उआ(जिंघ) /१११८, दि. २९/१२/२००८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २११, दि. १३/१/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेच्या व्हेईकल डेपो विभागाकडील क्लिनर (समय वेतन श्रेणी रू. २६१० ते रू. ५५१०+मान्य भत्ते ) या वर्ग ४ च्या हुद्दयाची रिक्त पदे भरणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस व प्रतिक्षा यादीस व त्यावरील उमेदवारांची सदर पदांच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

सदरची प्रतिक्षायादी ही निवडयादीवरील उमेदवारांच्या संख्येपर्यंत उमेदवार रूजू होईपर्यंत किंवा १ वर्षाचा कालावधी यापैंकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील.

**क्लिनर या पदासाठी निवडयादी अनुसूचित जमाती गटासाठी – २ जागा**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १) | श्री. पोटे संतोष धारू |
| २) | श्री.रेंगडे पांडुरंग गेणू |

**क्लिनर या पदासाठी प्रतिक्षा यादी अनुसूचित जमाती गटासाठी**

| क्र. | सेवकाचे नाव |
|---|---|
| १) | श्री. नांगरे विठ्ठल बाबू |
| २) | श्री.दांगट रोहिदास धर्माजी |

**विषय क्र. ५०२**

संदर्भ :- १) मा. महा.आयुक्त मआ/उरा/से/११२१, दि. ३०/१२/२००८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २१२, दि. १३/१/२००९.

---

Unregistered

मा. महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पर्यावरण संवर्धन अधिकारी ( खुला गट )( वेतन श्रेणी रू.१०,००० ते रू. १५,२०० + मान्य भत्ते ) या पदावर नेमणूकीबाबत मा.निवड समितीने शिफारस केलेली निवड/प्रतिक्षा यादीस तसेच सदर पदावर नेमणूक करण्यास करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षायादी ही निवडयादीवरील उमेदवारांच्या पर्यावरण संवर्धन अधिकारी या पदावर रूजू झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. मात्र एक वर्षानंतर ती प्रतिक्षायादी संपुष्टात आली आहे असे समजण्यात येईल.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | श्री. दिघे मंगेश संपतराव | खुला गट |

**प्रतिक्षा यादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | श्री. सोनुने गणेश श्रीराम | खुला गट |
| २) | श्री. मुक्कण्णावार उत्कर्ष सुरेश | खुला गट |

**विषय क्र. ५०३**

संदर्भ :– १) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. २/५/२००८ रोजीची नोटीस क्र.टीपीएस ४३०८/४६५/सीआर–६४/०८/नवि–११ ( राजपत्र प्रसिध्द दि. २९/५/२००८ )
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/७६५, दि. ५/११/२००८ चे पत्र.
३) मा. शहर सुधारणा समिती ठ.क्र. १८४, दि. ८/१२/२००८.
४) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २२७, दि. २७/१/२००९.

विषय – विशेष आर्थिक ( SEZ ) क्षेत्रात संबंधित महानगरपालिका / नगरपरिषदेची विकास नियंत्रण नियमावली लागू करणे व अधिसूचित क्षेत्रात ग्रॉस एरियावर आधारित ग्लोबल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत.

–––

मा. महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

कायदा व न्याय मंत्रालय, केंद्र शासन यांनी विशेष आर्थिक क्षेत्र ( SEZ ) अधिनियम २००५ हा कायदा अंमलात आणला आहे. सदर कायद्यानुसार अंतरदेशीय_एसपोर्टसाठी विशेष आर्थिक क्षेत्र ( SEZ ) झोन्सची स्थापना, विकसन व व्यस्थापन करण्याची तरतूद केली आहे. तसेच सदर विशेष आर्थिक क्षेत्राचे ( SEZ ) विकसनासाठी शासन स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक व नक्षररचना अधिनियम १९६६ चे कलम ४० अन्वये महानगरपालिका / अ वर्ग महानगरपालिका यांची विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण स्थापन करण्यात येत आहे. शासनाने जाहीर केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या ( SEZ ) विकसनास महानगरपालिकेतील विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. तसेच त्याव्यतिरिक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्देशानुसार विशेष आर्थिक ( SEZ ) क्षेत्रासाठी Resolution a to h अटींवर सदर नियमावली लागू करून सदर एस.ई.झेड.क्षेत्रासाठी ग्लोबल एफ.एस.आय.अुज्ञेय करण्यात येत आहे. शासन निदेशातील मुद्दे खालीलप्रमाणे –

१) संबंधित महानगरपालिकेचे महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी विशेष नियोजन प्राधिकरणाचे सभासद असतील.

२) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी विशेष आर्थिक क्षेत्रामधील दिलेल्या सर्व परवानग्यांबाबत संबंधित म.न.पा.स.३ महिन्यात माहिती घ्यावी. अन्यथा सदर बांधकामास काम थांबविण्याचे अधिकारी संबंधित

Unregistered

महानगरपालिकेस राहतील.

३) विशेष आर्थिक क्षेत्रामधील परवानगी विकास नियंत्रण नियमावलीनुसार नसल्यास त्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे राहतील.

४) विकास नियंत्रण नियमावलीत सवलत देण्याचे कोणतेही अधिकार विशेष नियोजन प्राधिकरणास राहणार नाहीत.

५) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी म.न.पा.हद्दीतील सर्व कर आकारणी व जमीन विकास निधी व इतर निधी पुणे महानगरपालिकेकडे भरणे आवश्यक आहे.

६) विशेष नियोजन प्राधिकरण यांनी शासनास वेळोवेळी प्रगती अहवाल देणे आवश्यक आहे.

७) विशेष आर्थिक क्षेत्रामधील विकास आराखड्यातील आरक्षणे आवश्यकतेनुसार हद्दीवर आरक्षणाचे स्थलांतर करावयाचे झाल्यास म.न.पा.च्या मान्यतेनुसार कार्यवाही करणार.

८) विशेष आर्थिक क्षेत्रामधील आरक्षण ॲकोमोडेशन रिझर्वेशन ऑफ रिझर्वेशननुसार विकसित करणार.

९) विशेष आर्थिक क्षेत्रामधील नॉन बिल्डेबल आरक्षण विकसित करून म.न. पा.स मोफत हस्तांतर करण्यात येईल. तसेच सदर आरक्षणातील २५ % एफ.एस.आय.अनुज्ञेय करण्यात येईल.

वरील प्रमाणे बदल करण्यास मे.शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१अे ) नुसार कार्यवाही करण्यास हरकती सूचना मागविण्यात आल्या असून त्यावर म.न.पा.चे म्हणणे सादर करण्यास मा.उपसंचालक, नगर रचना यांनी कळविले असून, त्याच बरोबर त्यांचे कार्यालयाकडे दाखल हरकती / सूचनांवर नियोजन प्राधिकरण म्हणून म.न.पा.चे म्हणणे / अभिप्राय देण्यास कळविले आहे. शासनाचे निर्देशानुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून खालीलप्रमाणे उपसंचालक, यांचेकडे अभिप्राय / हरकत नोंदविणे योग्य होईल, असे मा.महा.आयुक्त यांचे मत असून त्याप्रमाणे उपसंचालक यांचेकडे अभिप्राय / हरकत नोंदविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) शासनाचे प्रकटनातील Resolution g मध्ये विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये येणा–या आरक्षणाचे ॲकोमोडेशन ऑफ रिझर्वेशनबाबत उल्लेख आहे. तथापि मान्य विकास आराखड्यातील काही आरक्षणे उदा.ई.डब्ल्यू.एस., एच.डी.एच इ.मनपास बी.एस.यु.पी.प्रकल्पासाठी स्वतंत्र विकसित करावयाची असल्याने त्यामध्ये ॲकोमोडेशन ऑफ रिझर्वेशन अनुज्ञेय करण्यात येऊ नये.

२) पर्यावरणाच्या दृष्टीने हिल टॉप हिल स्लोप व ग्रीन बेल्ट या झोनमध्ये विशेष आर्थिक क्षेत्र जाहीर केल्यास सदर झोनमध्ये डी.सी.रूल नुसार ४ % चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे आवश्यक आहे.

३) मनपाच्या हद्दीतील विकसन प्रस्तावातील सर्व जमीन विकास निधी विशेष नियोजन प्राधिकरणाने मे.शासनाचे राजपत्रातील Resolution b प्रमाणे मनपाकडे जमा करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर मा.उपसंचालक यांचेकडे दाखल सूचना हरकतींवर मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतच्या तक्त्याप्रमाणे अभिप्राय कायम करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ५०४</u>

संदर्भ :– १) मा. अति.महा.आयुक्त मआ/उआ(क्र.४) १०९२, दि. २६/१२/२००८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २२८, दि. २७/१/२००९.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

हडपसर क्षेत्रिय कार्यालयीन हद्दीमध्ये पुणे मनपा हद्दीलगत विविध ठिकाणी टॅंकने पाणी पुरवठा करणे. ( भाग ब ) या कामी र.रू.१५ लाख खर्च (सदर काम मनपा हद्दी बाहेरील असल्याने ) खर्च करण्यास मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

Unregistered

## महिला बाल कल्याण समितीचा ठराव

**विषय क्र. ५०५**

